# “आरोग्याच्या सुपर स्पेशालिटी सेवा एकाच छताखाली”

## वृत्तपत्रिका

ऑगस्ट २०२६

मराठवाडा मेडिकल ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट

# कमलनयन बजाज हॉस्पिटल




मराठवाड्यातील एक विश्वसनीय रूग्णालय | अद्ययावत सुविधा व वैद्यकिय उपकरणांनी सुसज्ज | अनुभवी व निष्णात डॉक्टर्स
सर्व समावेशक सुविधा एकाच छताखाली असणारे रूग्णालय | मुत्रपिंड, यकृत आणि हृदय प्रत्यारोपण साठी मान्यता प्राप्त रूग्णालय

# “कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये गुरु पौर्णिमा उत्साहात साजरी”

1 August 2026






गुरु-शिष्य परंपरेप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये गुरु पौर्णिमा 2026 निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषण आणि गुरु पौर्णिमेचे महत्त्व सांगून झाली. त्यानंतर “Guess the Guru” या मनोरंजक उपक्रमाद्वारे सहकारी आणि मार्गदर्शकांच्या बालपणीच्या छायाचित्रांवरून त्यांची ओळख पटविण्याचा खेळ घेण्यात आला.

आपल्या मार्गदर्शकांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ग्रॅटिट्यूड थ्रेड सेरेमनी, भावपूर्ण गीतांचे सादरीकरण आणि उत्साहपूर्ण नृत्य सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन, सामूहिक छायाचित्र आणि स्नेहभोजनाने करण्यात आला.

“एक चांगला शिक्षक आशेची प्रेरणा देतो, कल्पनाशक्ती जागृत करतो आणि शिकण्याची आवड निर्माण करतो.” या विचाराला अनुसरून हा कार्यक्रम ज्ञान, मार्गदर्शन आणि कृतज्ञतेचा सुंदर उत्सव ठरला.

# “केबी नेफ्रोकॉन 2026 : आधुनिक एक्स्ट्राकॉर्पोरियल थेरपीजवर विशेष सीपीडी कार्यक्रम”

2 August 2026

कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या नेफ्रोलॉजी विभागातर्फे, फिजिशियन्स असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने “केबी नेफ्रोकॉन 2026” या विशेष सीपीडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



“Modern Extracorporeal Therapies – Evidence, Application & Future Directions” या विषयावर आयोजित या कार्यक्रमामध्ये हेमोडायलिसिस, एसएलईडी, एचडीएफ, हेमॅड्सॉर्प्शन, सीआरआरटी तसेच किडनी प्रत्यारोपण यांसारख्या आधुनिक उपचारपद्धतींवर तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन करण्यात आले.

वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उपचारपद्धती आणि भविष्यातील दिशा यांवर ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी हा कार्यक्रम एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरला. 2 ऑगस्ट 2026 रोजी हॉटेल एक्सप्रेस इन, छत्रपती संभाजीनगर येथे हा दिवसभराचा शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, कार्यक्रमासाठी 2 क्रेडिट पॉइंट्ससाठी मान्यता देण्यात आली आहे.

हा उपक्रम वैद्यकीय तज्ज्ञांचे ज्ञान आणि कौशल्य अधिक सक्षम करून रुग्णांना अधिक प्रभावी व गुणवत्तापूर्ण उपचार देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

Marathwada Medical & Research Institute

**Kamalnayan Bajaj Hospital**

The Complete Hospital

# THE FLU IS RISING.
# FEAR NEED NOT.

## Stay Informed. Stay Protected.

Influenza A (H1N1) cases are rising. Vaccination remains one of the best ways to reduce the risk of illness and complications.



### SPECIAL INFLUENZA VACCINATION DRIVE

29th August - 15th September

10:00 AM- 04:00 PM

Room No. 33 Ground Floor

**Special Vaccination Cost: Rs 1200/- per person (Zydus Vaxiflu)**

Applicable for all Family Members including Children & Grandparents

For Appointment Contact

**82753 88759**



### WHO SHOULD GET VACCINATED?

- Children
- Adults
- Senior Citizens

### WHY VACCINATE?

- ✓ Reduces risk of illness
- ✓ Helps prevent severe disease & complications
- ✓ Protects you and your family

**Dr. Nikhil Pathak**

Senior Consultant – Paediatrician & Neonatologist

**Don’t panic. Don’t wait.**

Get informed. Get vaccinated. Get protected.

STAY CONNECTED

Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital    www.bajajhospital.com

# “क्यूसीआय-एनएबीएच डिजिटल हेल्थ स्टँडर्ड्स 'गुणवत्ता यात्रा'चे कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये आयोजन”

5 August 2026





कमलनयन बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे Quality Council of India (QCI) यांच्या सहकार्याने QCI–NABH Digital Health Standards – 'गुणवत्ता यात्रा' या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये आरोग्यसेवा क्षेत्रातील व्यावसायिक आणि संस्थांना रुग्णालय व क्लिनिकच्या डिजिटल गुणवत्ता मानकांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरोग्यसेवा अधिक सुरक्षित, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या दिशेने हा कार्यक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

दिनांक: 5 ऑगस्ट 2026 | वेळ: दुपारी 3 वाजल्यापासून | स्थळ: कमलनयन बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर

# “मराठवाड्यातील आरोग्य शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल; बी.एस्सी. मेडिकल इमेजिंग अभ्यासक्रमासाठी त्रिपक्षीय सामंजस्य करार”

7 August 2026





छत्रपती संभाजीनगर येथील कमलनयन बजाज रुग्णालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि दीनदयाळ उपाध्याय कौशल्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बी.एस्सी. मेडिकल इमेजिंग अँड रेडिओलॉजी टेक्नॉलॉजी या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमासाठी त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून हा चार वर्षांचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. मराठवाडा विभागात अग्रगण्य तृतीयक स्तरावरील रुग्णालय आणि नॅक 'A+' मानांकनप्राप्त विद्यापीठाच्या सहकार्याने सुरू होणारा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना रेडिओग्राफी, सीटी स्कॅन, एमआरआय, मॅमोग्राफी आणि इतर आधुनिक वैद्यकीय इमेजिंग तंत्रज्ञानाचे ज्ञान व कौशल्य प्राप्त होणार असून, त्यांच्यासाठी देशात तसेच परदेशात रोजगार, उद्योजकता आणि उच्च शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.

## “मराठवाड्याच्या आरोग्यसेवेतील अभिमानास्पद योगदानाबद्दल डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' प्रदान”

10 August 2026



कमलनयन बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत प्रतिष्ठेचा 'मराठवाडा भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या मराठवाडा विभागीय अधिवेशनात त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वासाठी, समाजसेवेसाठी तसेच आरोग्यसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांचा हा सन्मान त्यांच्या कार्याची गौरवपूर्ण पावती असून, संपूर्ण कमलनयन बजाज हॉस्पिटल परिवारासाठी अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आरोग्यसेवेच्या क्षेत्रात अधिक उत्कृष्ट कार्य करण्याची प्रेरणा आम्हाला सतत मिळत राहील.

डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांचे या मानाच्या पुरस्काराबद्दल मनःपूर्वक अभिनंदन!

## “क्रीडा आरोग्यसेवेसाठी कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यात सामंजस्य करार”

11 August 2026







मराठवाडा मेडिकल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या (MMRI) कमलनयन बजाज हॉस्पिटलने भारतीय क्रीडा प्राधिकरण (Sports Authority of India – SAI) यांच्यासोबत सामंजस्य करारावर (MoU) स्वाक्षरी करून क्रीडा आरोग्यसेवेच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

या सहकार्याद्वारे खेळाडूंचे आरोग्य, तंदुरुस्ती आणि आवश्यक वैद्यकीय सेवांना अधिक बळकटी मिळणार आहे. क्रीडा क्षेत्रातील वैद्यकीय उत्कृष्टतेसाठी दोन्ही संस्थांचे हे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सशक्त खेळाडू, निरोगी क्रीडा भविष्य!

या सामंजस्य करारामुळे खेळाडूंच्या सर्वांगीण आरोग्यासाठी आणि उत्तम क्रीडा भविष्य घडविण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

Marathwada Medical & Research Institute

## Kamalnayan Bajaj Hospital

The Complete Hospital

# स्वतंत्रता दिवस विशेष

## स्वास्थ्य जाँच

## निरामय जीवन की स्वतंत्रता

हमारे विशेष स्वास्थ्य जाँच पैकेज के साथ
निरामय जीवन की ओर कदम बढ़ाते
मनाये स्वतंत्रता दिवस!

**कोई प्रशासकीय तथा मार्गदर्शन शुल्क नही!**

ऑफर ३१ अगस्त २०२६ तक

अपॉइंटमेंट तथा अधिक जानकारी हेतू संपर्क करे:
श्री. कृष्णा जाधव – 8830434676

### सब के लिए हेल्थ चेक-अप पॅकेज मे अंतर्भूत टेस्ट्स:

- हेमोग्राम अथवा CBC
- ब्लड शुगर F/PP
- बोन मिनरल डेन्सिटोमेट्री (BMD)
- क्रिएटिनिन
- लिपिड प्रोफाइल
- लिव्हर फंक्शन टेस्ट
- स्ट्रेस टेस्ट अथवा २D इको
- युरिक अ‍ॅसिड
- युरीन अ‍ॅनालिसिस
- USG अ‍ॅब्डॉमेन और पेल्विस
- एक्स-रे चेस्ट PA
- फिजिशियन कन्सल्टेशन

### केवल महिलांओं के लिए विशेष जांच:

साइटोलॉजी अथवा FNAC, मॅमोग्राफी
गायनॅकॉलॉजिकल कन्सल्टेशन, TSH

| पुरुषों के लिए | महिलाओं के लिए |
|---|---|
| ₹3,500 | ₹4,000 |



Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital    www.bajajhospital.com

STAY CONNECTED

## “कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन”

12 August 2026




समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी आणि रुग्णसेवेचा व्यापक दृष्टिकोन पुढे नेत कमलनयन बजाज हॉस्पिटल अँड नर्सिंग कॉलेज यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

“The Gift of Blood is a Gift to Someone's Life” या संदेशातून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेवर आवश्यक रक्त उपलब्ध होण्यास मदत होते आणि एखाद्या व्यक्तीच्या जीवनासाठी ते अत्यंत मोलाचे ठरू शकते.

या शिबिराचे आयोजन 12 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 9:30 ते सायंकाळी 4:30 वाजेपर्यंत कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे तसेच स्वेच्छा रक्तदानाबाबत जनजागृती करणे हा प्रमुख उद्देश आहे.

## “कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये स्वातंत्र्यदिनाचा अभिमानाने उत्सव”

15 August 2026





देशाच्या 80व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त, कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

15 ऑगस्ट 2026, शनिवार रोजी सकाळी 8:15 वाजता, कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या फ्रंट लॉन येथे ध्वजारोहण समारंभ संपन्न होईल. हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. धनश्री गवळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय पर्वानिमित्त कमलनयन बजाज हॉस्पिटल परिवार देशाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करताना, राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान देणाऱ्या सर्व वीरांना अभिवादन करेल. त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेत, सेवा, उत्कृष्टता आणि विश्वास या मूल्यांसह समाजाच्या आरोग्यसेवेसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात येईल.

“कालच्या बलिदानातून उद्याच्या अभिमानाचा जन्म होतो. आपल्या महान राष्ट्राची ओळख असलेल्या धैर्याला आणि जिद्दीला सलाम!”

## “केंद्रीय शिरा कॅथेटरायझेशन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन”

22 August 2026





कमलनयन बजाज हॉस्पिटल अँड नर्सिंग कॉलेज आणि औरंगाबाद ॲनेस्थेसियोलॉजी सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय शिरा कॅथेटरायझेशन (Central Venous Catheterization) विषयावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षणात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सैद्धांतिक व्याख्याने आणि Hands-on Training होणार असून, अल्ट्रासाऊंड मशीनचा वापर, Central Line टाकण्याची प्रक्रिया, Ultrasound-guided Catheterization, तसेच संकेत, प्रतिबंध, गुंतागुंत, योग्य जागा व कॅथेटरची निवड याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

हा कार्यक्रम शनिवार, 22 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 3 ते सायंकाळी 7 या वेळेत कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये होणार आहे. नोंदणी विनामूल्य असून अनिवार्य आहे.

## “आरोग्यसेवेतील आदरातिथ्य विषयावर विशेष कॉर्पोरेट प्रशिक्षण कार्यक्रम”

25 August 2026





कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या वतीने आरोग्यसेवा क्षेत्रातील सेवा गुणवत्ता आणि रुग्णांच्या अनुभवामध्ये अधिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने “Hospitality in Healthcare” या विषयावर विशेष कॉर्पोरेट प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षण सत्रासाठी लेमन ट्री हॉटेल्सच्या कॉर्पोरेट लर्निंग अँड डेव्हलपमेंट ट्रेनर सुश्री ओइंद्रिला रॉय मार्गदर्शन करणार आहेत. या सत्रामध्ये आरोग्यसेवा क्षेत्रातील आदरातिथ्याच्या सर्वोत्तम पद्धती, रुग्णांशी प्रभावी संवाद तसेच उत्कृष्ट सेवा अनुभव निर्माण करण्यासंबंधी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम 25 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 3 वाजता कमलनयन बजाज नर्सिंग कॉलेजच्या ऑडिटोरियममध्ये व्हर्च्युअल माध्यमातून आयोजित करण्यात येणार आहे.
या उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्यसेवा क्षेत्रातील सेवा उत्कृष्टता अधिक सक्षम करणे आणि रुग्णांना अधिक सकारात्मक व समाधानकारक अनुभव देण्यासाठी कर्मचाऱ्यांची कौशल्ये विकसित करणे हा प्रमुख उद्देश आहे.

# “वैद्यकीय इमेजिंग व रेडिओलॉजी तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाची दमदार सुरुवात”







मराठवाड्यात वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात नवा अध्याय सुरू करत कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये बी.एस्सी. मेडिकल इमेजिंग अँड रेडिओलॉजी टेक्नॉलॉजी (MIRT) अभ्यासक्रमाच्या पहिल्या बॅचसाठी इंडक्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील विद्यार्थ्यांना वैद्यकीय इमेजिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान, व्यावहारिक प्रशिक्षण आणि उद्योगाभिमुख कौशल्य विकासाबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

31 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची प्रेरणादायी सुरुवात झाली. दर्जेदार शिक्षण, अत्याधुनिक प्रशिक्षण आणि अनुभवी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून कुशल वैद्यकीय इमेजिंग व्यावसायिक घडविण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.

# “गर्भवती रुग्णावर आव्हानात्मक स्पाईन ट्यूमर शस्त्रक्रिया यशस्वी”




कमलनयन बजाज हॉस्पिटलने पाच महिन्यांच्या गर्भवती रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीची स्पाईन ट्यूमर शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली. रुग्णाच्या पाठीच्या कण्यातील L1 ते L4 स्तरांपर्यंत पसरलेला ट्यूमर नसांच्या अत्यंत जवळ असल्याने ही शस्त्रक्रिया विशेष आव्हानात्मक होती.

डॉ. अनुज भारुका, स्पाईन सर्जन, यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉ. बालाजी आसेगावकर, भूलतज्ज्ञ, डॉ. वेदत्रयी देशमुख, स्त्रीरोगतज्ज्ञ आणि डॉ. अमित पाटील, कन्सल्टंट न्यूरोसर्जन यांच्या समन्वयाने आई आणि बाळाच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेत उपचाराचे नियोजन करण्यात आले.

कमलनयन बजाज हॉस्पिटलमधील प्रगत तंत्रज्ञान आणि बहुविशेषज्ञ वैद्यकीय पथकाच्या उत्कृष्ट टीमवर्कमुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली असून आज आई आणि बाळ दोघेही सुरक्षित व निरोगी आहेत.

Marathwada Medical & Research Institute

**Kamalnayan Bajaj Hospital**

The Complete Hospital

# स्वतंत्रता दिवस विशेष
# स्वास्थ्य जाँच

## निरामय जीवन की स्वतंत्रता

**हमारे विशेष स्वास्थ्य जाँच पैकेज के साथ निरामय जीवन की ओर कदम बढ़ाते मनाये स्वतंत्रता दिवस!**

## कोई प्रशासकीय तथा मार्गदर्शन शुल्क नही!

**कालावधी:**

३१ अगस्त २०२६ तक

सॅम्पल कलेक्शन हेतू
होम व्हिजिट शुल्क – रु.100/-

एकही व्हिजिटमे तीन से अधिक
सॅम्पल लिए गये तो, यह सेवा मुफ्त होगी

अपॉइंटमेंट तथा अधिक जानकारी हेतू संपर्क करे:
श्री. कृष्णा जाधव – 8830434676

### ब्लड टेस्टस (पुरुष और महिला दोनों के लिए):

- हेमोग्राम अथवा CBC
- ब्लड शुगर F/PP
- क्रिएटिनिन
- लिपिड प्रोफाइल
- लिव्हर फंक्शन टेस्ट
- युरिक ॲसिड
- फिजिशियन कन्सल्टेशन

**प्रति व्यक्ती मात्र ₹ 1000**




Gut No. 43, Bajaj Marg, Satara Parisar, Beed Bypass Road, Chhatrapati Sambhajinagar.

@Kamalnayan Bajaj Hospital www.bajajhospital.com

STAY CONNECTED